**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# जाहिरात क्र. ०१/२०२०: अनुसूचित जमातीकरीता राखीव असलेली पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहिमेअंतर्गत "कनिष्ठ सहाय्क (लेखा)" या पदाची परिमंडळनिहाय प्रतिक्षा यादी

------

१. शासन निर्णय दि. २१/१२/२०१९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार अनुसूचित जमातीकरीता राखीव असलेली पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहिमेअंतर्गत जाहिरात क्र. ०१/२०२०, जाहिरात क्र. ०२/२०२० व जाहिरात क्र. ०३/२०२० अन्वये अनुक्रमे कनिष्ठ सहाय्यक (लेखा) / (मासं), उपकेंद्र सहाय्यक व विद्युत सहाय्यक या पदांकरीता दि. ०३/०२/२०२० रोजी जाहिराती प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या.

२. उपरोक्त जाहिरात क्र. ०१/२०२० अन्वये कनिष्ठ सहाय्यक (लेखा) पदाचा निकाल तसेच सविस्तर अधिसूचना दि. २४/०२/२०२३ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या.

३. निवड झालेल्या उमेदवारांच्या ऑनलाईन अर्जामधील नोंदी/अर्हता संबंधितांच्या प्रमाणपत्रांची छाननी/पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडळ कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. तसेच निवड यादीतील गैरहजर/अपात्र उमेदवारांच्या जागी प्रतिक्षा यादीवरील निवड झालेल्या उमेदवारांना यापुर्वी परिमंडळ कार्यालयांकडे वर्ग करण्यात आले होते व त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी संबंधीत परिमंडळामार्फत करण्यात आली आहे.

४. **प्रतिक्षा यादीतील गैरहजर/अपात्र उमेदवारांचा विचार करता प्रतिक्षा यादीतील उर्वरीत उमेदवारांची यादी सोबत जोडण्यात आली आहे. सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील उमेदवारांच्या ऑनलाईन अर्जामधील नोंदी/अर्हता संबधीतांच्या प्रमाणपत्रांची छाननी/पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबधित परिमंडळ कार्यालयामार्फत दि. ०१.०९.२०२३ रोजी कार्यालयीन कामकाजा दिवशी करण्यात येईल. सबब, सोबत जोडण्यात आलेल्या यादीमधील उमेदवाराच्या नावासमोर नमुद केलेल्या परिमंडळ कार्यालयामध्ये उपरोक्त कालावधीमध्ये उमेदवारांनी स्वत: हजर राहणे अनिवार्य राहील.**

५. जे उमेदवार कागदपत्रे पडताळणीकरीता हजर राहणार नाहीत अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द समजली जाईल व त्यांच्याशी भविष्यात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा त्यांच्या निवेदनाची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

६. ऑनलाईन अर्जामध्ये नोंदविलेल्या नोंदीसबंधित दस्तऐवज / दाखले छाननीकरीता सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची आहे. ऑनलाईन अर्जामधील व जाहिरातीमधील अर्हतेबाबत नमूद केलेली कागदपत्रे सादर करु शकले नाहीत तर त्याची निवड रद्द करण्यात येईल आणि त्यास उमेदवार सर्वस्वी जबाबदार राहील.

७. शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. २१/१२/२०१९ अन्वये निवड झालेल्या उमेदवारांकडे विहित प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. निवड झालेल्या उमेदवारांना नेमणुकी करिता हक्क म्हणून सांगता येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांची दस्तऐवज/कागदपत्रे छाननी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील अशा उमेदवारांच्या नियुक्त्यांबाबत कार्यवाही करण्यात येईल.

९. क्र. २७२२/२०२० व विविध न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या इतर याचिकांच्या अंतरिम/अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

**Sd/-**

**दिनांक : २९/०८/२०२३** **मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**1. ADVT.01/2020- ZONEWISE ALLOCATION OF WAIT LISTED CANDIDATE FOR THE POST OF JUNIOR ASSISTANT (ACCOUNTS)**

| Sr.No/ Rank in Wait List | Registration No | Roll No | Name of Candidate | Name of Allocated Zone |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 6 |
| 1/3 | 7309916 | 2010000563 | JAYSHRI RAMU CHAURE | BARAMATI |